# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**<u>अत्यंत तातडीचे/महत्वाचे</u>**

क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/४१५/२०२०
दिनांक : ११/१२/२०२०

प्रति,

प्राचार्य / विभागप्रमुख / मानद संचालक,
सर्व संलग्नीत संबंधीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी व पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग
मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा.

**विषय : उन्हाळी-२०२० परीक्षेकरीता अंतिम वर्ष/अंतिम सत्र व याच विद्यार्थ्यांचे इतर सत्रांचे अनुशेष वगळून इतर सर्व माजी विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या नियोजनासाठी तसेच एम.फिल.(माजी विद्यार्थी) परीक्षेच्या नियोजनासाठी कार्यपद्धती.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, कोविड-१९ च्या पार्श्वभूमिवर मा.सर्वोच्च न्यायालय, विद्यापीठ अनुदान आयोग तसेच शासनाद्वारे प्राप्त निर्देश तथा मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यापरिषद, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व व्यवस्थापन परिषद या प्राधिकारीणीनी घेतलेल्या निर्णयाच्या आधारे निदेश क्रमांक २०/२०२०, दिनांक २४/१०/२०२० मधील Appendix-I मध्ये नमूद उन्हाळी-२०२० च्या अंतिम वर्ष/अंतिम सत्र व त्याचे अनुशेष यांच्या परीक्षा संचालित करुन निकाल सुद्धा जाहिर करण्यात आले आहे.

विद्यापरिषद, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व व्यवस्थापन परिषद या प्राधिकारीणीनी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने उन्हाळी-२०२० परीक्षेकरीता अंतिम वर्ष / अंतिम सत्र व याच विद्यार्थ्यांचे इतर सत्रांचे अनुशेष वगळून इतर सर्व माजी विद्यार्थ्यांच्या परीक्षा तसेच एम.फिल.(माजी विद्यार्थी) परीक्षेच्या नियोजन करण्यात आले आहे. या परीक्षांचे संचालन व मूल्यांकन खालील पद्धतीने करण्यात यावे.

## परीक्षा संचालनाची कार्यपद्धती

**अ) उन्हाळी-२०२० परीक्षेकरीता पात्र असणारे विद्यार्थी :-**

१) उन्हाळी-२०२० परीक्षेकरीता अंतिम वर्ष / अंतिम सत्र व याच विद्यार्थ्यांचे इतर सत्रांचे अनुशेष वगळून इतर सर्व माजी विद्यार्थी.
२) एम.फील. माजी विद्यार्थ्यांची परीक्षा.
३) वरील १ नुसार जे विद्यार्थी उन्हाळी-२०२० परीक्षेकरीता परीक्षा आवेदनपत्र भरु शकले नाहीत असे विद्यार्थी.
४) उपरोक्त क्रमांक १ मधील प्रात्यक्षिक परीक्षेला अनुत्तीर्ण विद्यार्थी
५) श्रेणी सुधारकरीता परीक्षा आवेदन पत्र सादर केलेले विद्यार्थी सदर परीक्षेकरीता प्रवेशित होऊ शकणार नाहीत.

**ब) प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक परीक्षेबाबत :-**

१) पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमातील प्रात्याक्षिक परीक्षा व प्रकल्प परीक्षा (Dissertation/Project) महाविद्यालयाने त्यांचे स्तरावर आयोजीत करावयाच्या असून सदर परीक्षा प्रथम प्राध्यान्याने ऑनलाईन पद्धतीने बाह्य परीक्षकाची नियुक्ती न करता महाविद्यालयातील शिक्षकांची परीक्षक म्हणुन नियुक्ती करुन मौखिक स्वरुपात घेण्यात याव्या व प्रात्याक्षिक परीक्षांचे गुण प्रचलित पद्धतीने तातडीने विद्यापीठाकडे पाठविण्यात यावे.
२) जे विद्यार्थी Hard Copy मध्ये प्रकल्प सादर करु शकणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांचे प्रकल्प Soft Copy (CD) मध्ये घेऊन प्रचलित पद्धतीप्रमाणे सादर करण्यात यावे.
३) विद्यापीठाकडून कंट्रोलशिट्स प्राप्त होताच त्यामध्ये परीक्षार्थ्यांच्या परीक्षा क्रमांकानिहाय गुण भरण्यात यावेत व सदर कंट्रोलशिट्स सहाय्यक कुलसचिव (गोपनीय) यांचे नांवे विद्यापीठात सादर करावेत. अपवादात्मक परिस्थितीत विद्यापीठाकडून कंट्रोलशिट्स् प्राप्त न झाल्यास, किंवा ज्या परीक्षार्थ्यांचे परीक्षा क्रमांक कंट्रोलशिट्समध्ये नसतील अशा विद्यार्थ्यांचे गुण परीक्षानिहाय व विषयनिहाय प्राचार्यांच्या स्वाक्षरीने सहाय्यक कुलसचिव (गोपनीय) यांचेकडे सादर करावेत.

**क) परीक्षा प्रक्रियेचा कालावधी :-**

१) सर्व संबंधित महाविद्यालयांनी / विद्यापीठ शैक्षणिक विभागांनी/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांनी माजी विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा दिनांक १५/१२/२०२० ते २०/१२/२०२० या कालावधीत घ्याव्यात व प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण ऑनलाईन पोर्टलवर / कंट्रोलशिट्समध्ये प्रचलित पद्धतीने विद्यापीठाकडे पाठविण्यात यावे.

२) सर्व संबंधित महाविद्यालयांनी / विद्यापीठ शैक्षणिक विभागांनी/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांनी परीक्षेचे वेळापत्रक जाहिर करणे, महाविद्यालयाच्या / विद्यापीठ शैक्षणिक विभागांच्या /मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांचे संकेतस्थळावर व सूचना फलकावर प्रसिद्धी देणे, प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षा आयोजीत करणे, उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करणे व परीक्षार्थीचे गुण विद्यापीठाकडे पाठविणे, ही प्रक्रिया दिनांक २२/१२/२०२० ते ३०/१२/२०२० पर्यंत पूर्ण करावी.

**क) परीक्षा पद्धती :-**

**१) उन्हाळी-२०२० परीक्षेकरीता अंतिम वर्ष / अंतिम सत्र व याच विद्यार्थ्यांचे इतर सत्रांचे अनुशेष वगळून इतर सर्व माजी विद्यार्थ्यांच्या परीक्षा**

अ) विद्यार्थी ज्या महाविद्यालयात / विद्यापीठ शैक्षणिक विभागात प्रवेशित असेल, त्याच महाविद्यालयात विद्यार्थ्यांना परीक्षा देणे बंधनकारक राहील.

ब) विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन/ऑफलाईन स्वरुपात Asssignment पद्धतीने घेण्यात याव्यात.

क) Asssignment देण्यासाठी संबंधीत विषय़ाच्या अभ्यासक्रमांवर आधारित एकुण चार प्रश्न देण्यात यावेत. चार प्रश्नांपैकी विद्यार्थ्यांना कमित कमी कोणतेही दोन प्रश्न सोडवावे लागतील.

ड) प्रत्येक प्रश्नाला १० गुण राहतील.

इ) पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमातील प्रात्याक्षिक परीक्षा महाविद्यालयाने / विद्यापीठ शैक्षणिक विभागाने त्यांचे स्तरावर आयोजीत करावयाच्या असून सदर परीक्षा प्रथम प्राध्यान्याने ऑनलाईन पद्धतीने बाह्य परीक्षकाची नियुक्ती न करता मौखिक स्वरुपात घ्याव्यात व प्रात्याक्षिक परीक्षांचे गुण प्रचलित पद्धतीने ताबडतोब विद्यापीठाकडे पाठविण्यात यावे.

**२) एम.फील परीक्षेकरीता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा**

अ) एम.फील विद्यार्थ्यांची परीक्षा M.C.Q.-Multiple Choice Question ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात याव्यात.

ब) अशा विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयाने त्यांचे स्तरावर संबंधीत विषयाच्या अभ्यासक्रमावर आधारित एकुण ४० प्रश्नांच्या विषयनिहाय प्रश्नपत्रिका तयार कराव्यात. ४० प्रश्नांपैकी विद्यार्थ्यांना कमित कमी कोणतेही २० प्रश्न सोडवावे लागतील.

क) प्रत्येक प्रश्नाला दोन गुण राहतील.

ड) प्रश्नपत्रिका सोडविण्याकरीता एक तासांचा अवधी राहील.

इ) चुकीच्या उत्तरासाठी निगेटीव्ह मार्कींग सिस्टीम असणार नाही.

ई) परीक्षा केंद्रावर तयार करण्यात आलेल्या सर्व प्रश्नपत्रिकांची (एकेक प्रत) परीक्षा संपल्यानंतर पंधरा दिवसाचे आंत विद्यापीठाच्या गोपनीय विभागात जमा कराव्यात.

फ) दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडविण्याकरीता २० मीनीटांचा अतिरिक्त वेळ देण्यात यावा.

**३) परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारणे व परीक्षा क्रमांक देण्याची पद्धती**

i) अंतिम वर्ष/अंतिम सत्रातील (नियमित/माजी/बहिःशाल) विद्यार्थी व याच विद्यार्थ्यांचे इतर सत्रांचे अनुशेष वगळून ज्या माजी विद्यार्थ्यांनी उन्हाळी-२०२० करीता परीक्षा आवेदनपत्रे सादर केले नसतील, अशा विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्रे विद्यार्थी शिकत असलेल्या महाविद्यालयात परीक्षेचे मूळ शुल्कासह सादर करावीत.

ii) विद्यार्थ्यांची परीक्षा आपल्या महाविद्यालयाच्या / विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या परीक्षा केंद्रावर घेतेवेळी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाकडून/विद्यापीठ शैक्षणिक विभागाकडून परीक्षा क्रमांक द्यावयाची कार्यवाही करावयाची आहे. परीक्षा क्रमांक देतेवेळी परीक्षानिहाय सर्वप्रथम ९ क्रमांक टाकून त्यानंतर महाविद्यालयांचा/विद्यापीठ शैक्षणिक विभागाचा सांकेतांक व पुढील अनुक्रमांकानुसार विद्यार्थ्यांना परीक्षा क्रमांक देण्यात यावे. (उदाहरणार्थ-महाविद्यालयाचा सांकेतांक १०१, त्यानुसार बी.ए.करीता ९१०११, ९१०१२, ९१०१३---, बी.कॉम. करीता ९१०११, ९१०१२, ९१०१३---, बी.एस्सी.करीता ९१०११, ९१०१२, ९१०१३---)

iii) विद्यार्थ्यांचे गुण विद्यापीठातील केंद्रीय मूल्यांकन कार्यक्रम केंद्र येथे सादर करतेवेळी नव्याने परीक्षा आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे व शुल्क भरलेली पावती जमा करण्यात यावी.

**ड) परीक्षेची कार्यपद्धती :-**

१) एम,फिल. परीक्षेकरीता ऑनलाईन पद्धतीने परीक्षांचे आयोजन करतांना Google Form/Mooddle/LMS इत्यादींचा वापर करावा. ऑफलाईन पद्धतीसाठी विद्यार्थ्यांना हार्डकॉपीस्वरुपात प्रश्नपत्रिका उपलब्ध करुन द्यावी. सदर विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिकेतील योग्य उत्तरावर टिकमार्क (√) करावी.

२) परीक्षा क्रमांक सूचीनुसार विद्यार्थ्यांना यापूर्वी देण्यात आलेले परीक्षा क्रमांक या परीक्षेकरीता कायम राहतील. तसेच ज्या विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत परीक्षा क्रमांक/प्रवेश पत्रे प्राप्त झालेली नाहीत, अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमार्फत / विद्यापीठ शैक्षणिक विभागामार्फत विद्यापीठाशी संपर्क साधून परीक्षा क्रमांक प्राप्त करुन घ्यावेत.

३) बहिःशाल विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याकरीता जे परीक्षा केंद्र देण्यात आलेले आहे, त्या परीक्षा केंद्राशी पुरेशा वेळेआधी संपर्क साधावा व त्या महाविद्यालयाच्या/ विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा द्यावी. बहिःशाल विद्यार्थ्यास देण्यात आलेल्या परीक्षा केंद्रावर त्याला द्यावयाच्या परीक्षेची प्रश्नपत्रिका उपलब्ध नसल्यास सदर महाविद्यालयाने विद्यापीठाशी संपर्क साधावा. विद्यापीठाद्वारे महाविद्यालयाला Assignment प्रश्नपत्रिका पुरविण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन विद्यापीठ स्तरावर होईल. विद्यापीठाने जाहिर केलेल्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पद्धतीने देता येईल.

४) महाविद्यालये समुह पद्धतीने (क्लस्टर) परीक्षांचे आयोजन करु इच्छितात, त्यांनी त्यांचे स्तरावर समुह तयार करावा, व विद्यापीठाला सदर समुहाबाबत माहिती द्यावी. सदर समुहातील विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक व प्रश्नपत्रिका एकसमान राहतील.

५) परीक्षेच्या संचालनाचे वेळी महाविद्यालयांद्वारे/ विद्यापीठ शैक्षणिक विभागाद्वारे तसेच विद्यार्थ्यांद्वारे परीक्षेसंदर्भात संपूर्ण गोपनियता पाळण्यात यावी.

**इ) मूल्यांकन व गुणदानाची कार्यपद्धती :-**

१) परीक्षांकरीता विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास सादर केलेल्या Assignment चे मुल्यांकन करतांना विद्यार्थ्यांनी सोडविलेल्या एकुण प्रश्नांपैकी जास्त गुण प्राप्त असलेल्या दोन प्रश्नांचे गुण ग्राह्य धरावे, सदर प्रश्नांना वीस पैकी गुण द्यावेत. २० पैकी १६ गुण प्राप्त झाल्यास अशा वेळी विद्यार्थ्यास सदर विषयाची लेखी परीक्षा स्किमनुसार उदाहरणार्थ ८० गुणांची असल्यास त्या विद्यार्थ्यास २० पैकी १६ या अनुपातात ८० पैकी ६४ गुण कंट्रोलशिटवर भरावे.) **गुणदान सुत्र-** (20 : 16, 80 : ? = 80 X 16/20=64) याप्रमाणे गुणदान करुन **दिनांक ३०/१२/२०२० पर्यंत विद्यापीठात कंट्रोलशिट/ऑनलाईन पोर्टलवर सादर करावे.**

२) मूल्यांकन झाल्यानंतर ऑनलाईन पोर्टलवर गुण भरावयाच्या परीक्षा-B.E., B.Tech., B.Text., B.Arch., B.A.Sem.I, II, III, IV. B.Com.Sem.- I, II, III. B.Sc.Sem- I, II, III व इतर परीक्षांचे गुणदान विद्यापीठाने पुरविलेल्या ग्रीन व ब्लॅक कंट्रोलशिट्सवर करावे. तसेच पोर्टलवर भरलेल्या गुणांची Soft Copy महाविद्यालयातच संग्रहित करुन ठेवावी.

३) विषयाचे गुण कंट्रोलशिट्स मध्ये भरल्यानंतर प्राचार्य/विभागप्रमुख यांनी रॅन्डम पद्धतीने तपासून घ्यावेत.

४) एम.फिल.अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता प्रवेशित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन/ऑफलाईन सोडविलेल्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी संबधित विषय शिक्षकांकडून करुन घ्यावे.

५) एम.फील परीक्षेचे उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करतेवेळी विद्यार्थ्यानी सोडविलेल्या एकुण प्रश्नापैकी अचूक २० उत्तरानांच गुणदान करावे, व गुणदान झाल्यानंतर सदर विषयाच्या परीक्षेच्या स्कीम प्रमाणे संबंधित विषयाच्या लेखी परीक्षेसाठी असलेल्या एकुण गुणांमध्ये रुपांतरीत करुन प्रचलित पद्धतीने **दिनांक ३०.१२.२०२० पर्यंत विद्यापीठाकडे कंट्रोलशिट/ऑनलाईन पोर्टलवर पाठवावेत.** (उदाहरणार्थ- M.C.Q.-Multiple Choice Question ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने विद्यार्थ्याने प्रश्नपत्रिकेतील ४० प्रश्नांपैकी १७ प्रश्न बरोबर सोडविले, अशा वेळी विद्यार्थ्यास प्रत्येक प्रश्नास २ गुण याप्रमाणे ४० पैकी ३४ गुण प्राप्त होतात, सदर विषयाची लेखी परीक्षा स्किमनुसार ८० गुणांची असल्यास त्या विद्यार्थ्यास ४० पैकी ३४ या अनुपातात ८० पैकी ६८ गुण कंट्रोलशिटवर भरावे.) **गुणदान सुत्र-(40:34, 80 : ? = 80 X 34/40=68)**

६) विविध परीक्षांचे मूल्यांकन पूर्ण झाल्यानंतर विद्यापीठाद्वारे वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांच्या आधारे महाविद्यालयांचे प्राचार्य/विद्यापीठ शैक्षणिक विभागप्रमुख/मानद संचालक, मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यानिशी सिलबंद लिफाफ्यात लेखी परीक्षेच्या ग्रीन व ब्लॅक कंट्रोलशिट्स मुख्य अधिकारी, केंद्रीय मूल्यांकन कार्यक्रम केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेकडे पाठविण्यात याव्यात. तसेच लिफाफ्यावर महाविद्यालयाचे नाव, परीक्षेचे नांव व विषयाचे नांव ठळकपणे नमूद करावे.

**ई) परीक्षांचे निकाल जाहिर करण्याबाबतची कार्यपद्धती :-**

१) विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे निकाल प्राप्त अंतर्गतसत्र गुणांच्या टक्केवारीच्या ५० टक्के व लेखी परीक्षेत प्राप्त गुणांच्या टक्केवारीच्या ५० टक्के गुण या आधारावर घोषित केले जातील. उदाहरणार्थ-लेखी परीक्षेचे ८० व अंतर्गत सत्र परीक्षांचे २० गुण (८०:२०) या पॅटर्नमध्ये विद्यार्थ्यांस २० गुणांपैकी १८ अंतर्गत सत्र गुण प्राप्त झाल्यास, म्हणजेच ९० टक्के गुण प्राप्त होतील. प्राप्त गुणांच्या टक्केवारीचे ५० टक्के म्हणजे ४५ अंतर्गतसत्र गुण ग्राह्य धरण्यात येतील. तसेच लेखी परीक्षेत ८० गुणांपैकी प्राप्त ४० गुण म्हणजेच प्राप्त गुणांची टक्केवारीचे ५० टक्के होईल. सदर लेखी परीक्षेतील गुणांच्या टक्केवारीचे ५० टक्के म्हणजेच २५ गुण ग्राह्य धरण्यात येतील. अंतर्गत सत्र गुणांची टक्केवारी ४५ टक्के अधिक लेखी परीक्षेचे गुण २५ असे एकूण ७० गुण विद्यार्थ्यास संबंधित विषयात देतांना मिळालेले आहेत. अंतर्गत सत्र गुण कायम ठेवून उर्वरीत (७०-१८=५२ गुण) ५२ गुण लेखी परीक्षेत प्राप्त होतील.

२) ज्या विद्यार्थ्यांना अंतर्गत सत्र गुण नाहीत, त्या विषयाच्या विद्यार्थ्याचा निकाल लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीचे ५० टक्के व प्रात्याक्षिक परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीचे ५० टक्के गुण विचारात घेवून निकाल तयार करण्यात येईल.

३) ग्रेस मार्क्समध्ये उन्हाळी-२०२० परीक्षेकरीता '1%' वरून '2%' वाढ करण्यात येईल.

४) सदर परीक्षेच्या सुचारु आयोजनाच्या दृष्टीने तसेच विद्यार्थ्यांना मदत करण्याचा हेतू ठेवून आवश्यकतेनुसार समन्वय समितीचे गठण करण्यात येईल,

५) सर्व महाविद्यालयांना त्यांचे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उपरोक्त कार्यपद्धतीनुसार परीक्षा घेणे बंधनकारक राहील.

६) परीक्षेचे गांभिर्य व गोपनीयबाबतचे प्रचलित निकष पाळण्याची जबाबदारी सर्व संबंधीत महाविद्यालयांची राहील.

७) महाविद्यालयांकडून गुण प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयाच्या प्राप्त गुणांच्या आधारे महाविद्यालयनिहाय परीक्षांचे निकाल जाहिर करण्यात येईल.

**उ) महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभाग/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा या परीक्षा केंद्रावर कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षा व आरोग्य हित लक्षात घेता, खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.:-**

१) परीक्षा केंद्रावरील सफाईगारांना व संबंधितांना स्वच्छता व निर्जंतुकीकरण (Periodic Sanitization) प्रशिक्षित करण्यात यावे.

२) सर्व महाविद्यालये / विद्यापीठ शैक्षणिक विभाग / मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांनी त्यांचे परीक्षा केंद्रावर मुख्य वाहतुक रस्त्याने व परीक्षा केंद्राच्या इमारतीच्या आतील व बाहेरील भागांची औषध फवारणीद्वारे नियोजीत कालावधीत निर्जंतुकीकरण करावे.

३) परीक्षा केंद्रावर, प्रशासकीय विभागात आणि परीक्षा गृहात Hand Sanitizer व Handwash ची व्यवस्था करण्यात यावी.

४) परीक्षा केंद्रावर परीक्षा संचालनादरम्यान कार्य करणारे शिक्षक, पर्यवेक्षक, वॉटरमन व इतर सर्व कर्मचारी यांना Mask शिवाय प्रवेश निषिद्ध राहील. तसेच सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना Mask वापरण्याबाबत महाविद्यालयाने आपले स्तरावर न चुकता अवगत करावे.

५) विद्यार्थ्यांची खोलीनिहाय बैठक व्यवस्था ही Physical Distancing चे पालन होईल, या पद्धतीने करण्यात यावी.

६) Thermal Scanner ची व्यवस्था करण्यात यावी.

७) परीक्षा केंद्रावर वॉटर कुलर व प्रसाधन गृहाचा वापर बाहेरील कोणतीही व्यक्ती करणार नाही, याची पुर्णपणे दक्षता घेण्यात यावी.

८) परीक्षा केंद्रावरील उपहार गृहामध्ये सुद्धा उपरोक्तप्रमाणे प्रतिबंधात्मक व्यवस्था करणे आवश्यक राहील, तसे निर्देश संबंधीत व्यवस्थापकास देण्यात यावे.

९) परीक्षा केंद्रावर वापरण्यात येणारे Disposable Mask व Hand Gloves सुरक्षितपणे नष्ट करण्याची काळजी घेण्यात यावी.

१०) कोविड-१९ प्रभाव थुंकीतूनही होत असल्यामुळे परीक्षा केंद्राच्या इमारतीमध्ये व परिसरात कुणीही थुंकणार नाही, याबाबतची विशेष काळजी घेण्यात यावी, जर असे आढळल्यास संबंधीतांवर दंडात्मक कार्यवाही त्वरित करण्यात यावी.

११) परीक्षा केंद्रावरील / महाविद्यालयाचे / विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या इमारतीमध्ये व परिसरामध्ये दर्शनी भागावर कचरा पेटी ठेवण्यात यावी.

१२) कोविड-१९ चा प्रादुर्भाव टाळण्याकरीता शासनाद्वारे/U.G.C./A.I.C.T.E इत्यादी शिखर संस्थेद्वारे प्राप्त निर्देशानुसार तसेच निर्गमीत मार्गदर्शक तत्वांचे अवलोकन करुन इतरही बाबींचा अवलंब करण्यात यावा.

१३) परीक्षा केंद्रामध्ये निर्जंतूकीकरण व्यवस्था व बैठक व्यवस्था ही शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार महाविद्यालयांद्वारे करण्यात यावी.

**ऊ) ऑनलाईन तसेच ऑफ लाईन पद्धतीने परीक्षा केंद्रावर होणाऱ्या गैरमार्गाच्या अवलंबा बाबत कार्यवाहीः-**

१) परीक्षा केंद्रावर होणाऱ्या परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांने अथवा इतरांनी गैरमार्गाचा अवलंब केल्यास, अशी सर्व प्रकरणे विद्यापीठाने महाविद्यालयास पुरविलेल्या विहित प्रपत्रात आवश्यक ती माहिती भरुन त्वरित सहाय्यक कुलसचिव (गोपनीय) यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

२) महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या परीक्षेमधील गैरमार्गाच्या प्रकरणांची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ नुसार दखल घेण्यात येईल.

**ए) परीक्षा केंद्रांना आपल्या स्तरावर ऑफलाईन परीक्षांच्या संचालनाकरीता खर्च निर्देश क्रमांक २०/२०२० प्रमाणे देय राहील.**

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन परीक्षा संचालनास सहकार्य करावे, ही विनंती.

धन्यवाद.

आपला,

(डॉ.हेमंत आर.देशमुख)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ